डिजीटल भूमि अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रमात ई-महाभूमि अंतर्गत संगणीकृत डिजीटल स्वाक्षरीने गा.न.नं.७/१२, ८-अ व फेरफार उपलब्ध करून देण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## महसूल व वन विभाग

**शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण-२०२१/प्र.क्र.२३५/ल-१**

पहिला मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २९ जुलै २०२६.

**वाचा :-**

१. महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०२१.क्र.प्र/२३५-ल/१.दि ,२९.११.२०२२.
२. महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०२१.क्र.प्र/२३५-ल/१.दि ,२०.०५.२०२५.

**प्रस्तावना :-**

राज्यात डिजीटल भूमि अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रम ई-महाभूमि या नावाने राबविण्यात येत आहे. ई-महाभूमि अंतर्गत विकसीत करण्यात आलेल्या आज्ञावलीमधून गा.न.नं.७/१२, गा.न.नं.८-अ व फेरफार या अधिकार अभिलेखांच्या नकला संगणकीकृत डिजीटल स्वाक्षरीने ऑनलाईन पध्दतीने विविध घटकांना शुल्क आकारून उपलब्ध करून देण्यात येतात. सदर घटकांना आकारण्यात येणाऱ्या शुल्कामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय :-**

ई-महाभूमि अंतर्गत विकसीत करण्यात आलेल्या आज्ञावलीमधून गा.न.नं.७/१२, गा.न.नं.८-अ व फेरफार या अधिकार अभिलेखांच्या नकला संगणकीकृत डिजीटल स्वाक्षरीने ऑनलाईन पध्दतीने विविध घटकांना उपलब्ध करून देण्यासाठी आकारावयाच्या शुल्काबाबत वित्त विभागाच्या मान्यतेने वाचा क्र. १ व वाचा क्र.२ येथील शासन निर्णय निर्गमित करण्यात आले आहेत. सदर घटकांना आकारण्यात येणाऱ्या शुल्कात सुधारणा करण्याच्या अनुषंगाने वाचा क्र.१ व २ येथे नमूद शासन निर्णय अधिक्रमित करून ई-महाभूमि अंतर्गत विकसीत करण्यात आलेल्या आज्ञावलीमधून गा.न.नं.७/१२, गा.न.नं.८-अ व फेरफार या अधिकार अभिलेखांच्या नकला संगणकीकृत डिजीटल स्वाक्षरीने ऑनलाईन पध्दतीने वितरीत करण्यासाठी खालीलप्रमाणे सुधारित शुल्क आकारण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**सशुल्क/निशुल्क वितरण तक्ता**

| अ.क्र. | वापरकर्ता | ७/१२, ८-अ व फेरफार माहितीचे स्वरूप | शुल्क सुविधा | सेवा शुल्क | विविध घटकांचा हिस्सा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | नागरिक (एकल) | संगणकीकृत स्वाक्षरीत PDF स्वरूपात. | प्रिपेड वॉलेट | रू.१५ प्रती अभिलेख | DILRMP चे जमाबंदी आयुक्त यांचे PLA रू.१०/- व महाराष्ट्र शासन रू.५/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | सरकारी/खाजगी बँका | i) संगणकीकृत स्वाक्षरीत PDF स्वरूपात<br>ii)संगणकीकृत स्वाक्षरीत डेटा स्ट्रीम (डेटा स्वरूपात) | पोस्टपेड १ महिना क्रेडीट | रू.१५/- प्रती अभिलेख | DILRMP चे जमाबंदी आयुक्त यांचे PLA रू.१०/- व महाराष्ट्र शासन रू.५/- |
| ३ | महाराष्ट्र शासनाचे प्रशासकीय विभाग | i) संगणकीकृत स्वाक्षरीत PDF स्वरूपात<br>ii)संगणकीकृत स्वाक्षरीत डेटा स्ट्रीम (डेटा स्वरूपात) | निशुल्क | | |
| ४ | सार्वजनिक उपक्रम, सार्वजनिक महामंडळे, स्वायत्त संस्था व स्थानिक स्वराज्य संस्था | i) संगणकीकृत स्वाक्षरीत PDF स्वरूपात<br>ii)संगणकीकृत स्वाक्षरीत डेटा स्ट्रीम (डेटा स्वरूपात) | पोस्टपेड १ महिना क्रेडीट | रू.१५/- प्रती अभिलेख | DILRMP चे जमाबंदी आयुक्त यांचे PLA रू.१०/- व महाराष्ट्र शासन रू.५/- |
| ५ | भारत सरकारचे असे विभाग जे महसूल अभिलेख घेऊन स्व विभागाकडील data share करतात | i) संगणकीकृत स्वाक्षरीत PDF स्वरूपात<br>ii)संगणकीकृत स्वाक्षरीत डेटा स्ट्रीम (डेटा स्वरूपात) | निशुल्क | | |
| ६ | भारत सरकारचे असे विभाग जे महसूल अभिलेख घेऊन स्व-विभागाकडील data share करत नाहीत. | i) संगणकीकृत स्वाक्षरीत PDF स्वरूपात<br>ii)संगणकीकृत स्वाक्षरीत डेटा स्ट्रीम (डेटा स्वरूपात) | पोस्टपेड १ महिना क्रेडीट | रू.१५/- प्रती अभिलेख | DILRMP चे जमाबंदी आयुक्त यांचे PLA रू.१०/- व महाराष्ट्र शासन रू.५/- |

२. उपरोक्त वापरकर्त्यांशिवाय UPMU व्दारे वा UPMU च्या मदतीने अंमलबजावणी करण्यात येणाऱ्या सर्व प्रकल्पांना सदर सेवा निशुल्क उपलब्ध होईल.

३. Application Programming Interface (APIs) व्दारे संगणकीकृत डिजीटल स्वाक्षरीने गा.न.नं.७/१२, गा.न.नं.८-अ व फेरफार हे अधिकार अभिलेख उपलब्ध करून द्यावयाच्या अनुषंगाने सामंजस्य करार करण्याचे व सामंजस्य करारामध्ये समाविष्ट करावयाच्या अटी व शर्ती निश्चित करण्याचे अधिकार जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान करण्यात येत आहेत.

४. भारत सरकार व महाराष्ट्र शासनाचे विभाग/महामंडळे, सार्वजनिक उपक्रम व विविध सरकारी/खाजगी बँका यांनी Application programming Interface (APIs) द्वारे विशेषतः Bulk data Download द्वारे उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सेवा वापर करताना कोणत्याही परिस्थितीत डिजीटल वैयक्तीक डेटा

संरक्षण कायदा-२०२३ (The Digital Personal Data Protection Act २०२३) कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन होणार नाही, याची विशेष दक्षता घेण्यात यावी.

**५.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०७२९१४५७३०२७४८ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

SANJAY RAGHUNATH BANKAR

Digitally signed by SANJAY RAGHUNATH BANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT,
2.5.4.20=C8A7D6860FF227FD9E69A02E9CA5DFB2CCB25EDA92D749629970F349FC6ED260, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=C5917E56B0DA516AB259D846D516CB0584DCE5E9A2E73C0A35FA47BAB64E88AA, cn=SANJAY RAGHUNATH BANKAR
Date: 2026.07.29 14:58:54 +05'30'

**( संजय बनकर )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत:-**

१. मा. राज्यपालांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव.
३. मा. उप मुख्यमंत्री [नगरविकास, गृह निर्माण, सार्वजनिक बांधकाम (सा.उ.)] यांचे सचिव.
४. मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, अल्पसंख्यांक विकास व औकाफ) यांचे सचिव.
५. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव
६. सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
७. सर्व मा.विधानसभा सदस्य व विधानपरिषद सदस्य
८. मुख्य सचिवांचे स्वीय सहायक
९. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई
१०.सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
११. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१ मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर.
१२.महालेखापाल (लेखा परिक्षा) महाराष्ट्र-१ मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर.
१३. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४.भूमापन कार्यासन संग्रहार्थ.